ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "संगीत कलेचे आश्रयदाते : राजर्षी छत्रपती शाहू महाराज"



**प्रा.महेश जगन्नाथ साखरे**
**इतिहास विभाग , डि.बी.दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय,सोलापूर .**

## • प्रस्तावना :-

महाराष्ट्राच्या इतिहासात ज्या तीन राजर्षीनी संस्मरणीय सांस्कृतिक कामगिरी केली आणि महाराष्ट्राची समृध्द सांस्कृतिक जडण-घडण केली ते म्हणजे बडोदयाचे सयाजीराव गायकवाड, ग्वाल्हेरचे माधव महाराज व कोल्हापूरचे शाहू महाराज त्या तिघांनी अनेक कलावंतांना आधार आणि प्रोत्साहन देऊन नाव मिळवून दिले. एवढेच नव्हे तर कलावंताच्या अनेकानेक पिढया घडवल्या. पण त्या तिघांमध्ये ही क्रम लावायचा झाला तर निःसंशयपणे पहिले नाव शाहू महाराजांचेच घ्यावे लागेल एवढे प्रचंड कार्य त्यांनी या संदर्भात करुन ठेवले आहे. आधुनिक काळामध्ये त्यांच्याइतका मर्मज्ञ, गुणग्राहक, रसिक व जाणता राजा देशात शोधून सापडणार नाही.

## • शोधनिबंधाचा उद्देश :-

प्रस्तुत शोधनिबंधात राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात संगीत कलेला दिलेल्या राजाश्रयाबद्दल चर्चा करण्यात आली आहे.

## • संगीताचे आश्रयदाते राजर्षी छत्रपती शाहू महाराज :-

कोल्हापूर संस्थानाला संगीताची दीर्घ परंपरा होती. किर्तन, तमाशा, लावणी, दिंडी, वाघ्या-मुरळीची गाणी, लोकसंगीत, ठुमरी-गझल ध्रुपद अशा विविध संगीत प्रकारामध्ये सहाशेहून अधिक कलावंत शाहूच्या मुखत्यारीच्या आधीपासून तिथे वास्तव्य करुन होते. देशातील पहिली संगीत विषयक संस्था ज्याला म्हणता येईल तो कोल्हापूर गायन समाज १८८३ मध्ये त्यांच्याच पाठ बळावर स्थापन झाला होता. महाराजांच्या आश्रय व प्रेरणेच्या बळावरच १८९२ मध्ये स्थापन झालेल्या देवलक्लब संस्थेची कीर्ती संपूर्ण देशभर पसरली होती. संगीतज्ञ एस.ए.कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे देशात आज कीर्तिमान झालेल्या अनेक संगीत घराण्यांच्या गायक - गायिकांची वंशावळ करवीर नगरीतच संवर्धिली गेली आहे आणि त्याचे मुळ प्रणेते शाहू महाराज हेच होते. कलावंतांच्या दर्जेदार शास्त्रोक्त संगीताचा गायक वादक असो की ठुमरीचा वा भजनांचा गायक असो त्याला महाराजांकडून सारखाच मान व प्रोत्साहन मिळत असे महाराजांना संगीत ऐकण्याचा विलक्षण नाद होता. संगीत ऐकताना ते स्वतःचा व मानमरातबच नव्हे तर स्थळकाळ वेळाचे भान ही पार विसरुन जात असत.

ज्या क्षेत्रातील कलावंतांना छत्रपतींनी राजाश्रय दिला त्या सर्वच क्षेत्रांची त्यांची स्वतःची जाणकारी त्यांनी सतत वाढवत ठेवली होती. हे ही छत्रपतींचे एक आगळेवेगळे वैशिष्टे ठरते. गायन कलेतील बारकावे आपल्याला समजावेत व मर्म कळावे यासाठी त्यांनी पांडुतात्या ढेरे यांच्या सारखे संगीताचे जाणकार सोबत बाळगले होते. पुढे संगीताच्या क्षेत्रातील माउंट एवरेस्ट म्हणून ज्यांच्या गौरव केला जातो ते गान महर्षी अल्लदियाखाँ साहेब यांना शाहू महाराजांनी १८९५ मध्ये दरबारी गायक म्हणून आणले त्यांच्या स्वरुपात जयपूर घराण्याच्या गायकीचा महाराष्ट्रात प्रवेश झाला आणि पुढच्या काळात झपाटयाने प्रसारही झाला. अल्लादियाखाँ साहेबांना संपूर्ण देशामध्ये लौकिक मिळाला. संगीत विद्यापीठातून बाहेर पडलेल्या अल्लादियाखाँ साहेबांच्या शिष्य स्नातकांची नुसती नावे जरी नजरे खालून घातली तरी त्याने संगीत क्षेत्रात केवढी जबरदस्त कामगिरी बजावली आहे याची कोणालाही कल्पना येऊ शकेल. पं.भास्करबुवा बखले, नथ्थन खाँ, केसरबाई केरकर, हैदरखाँ, मजीखाँ, मोगूबाई कुर्डीकर जसदनवाला शाळिग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक अशी आखिल भारतीय कीर्तीची कितीतरी तोलामोलाची माणसे

संगीत क्षेत्रात होती. संगीतज्ञ बाबूराव जोशींनी म्हटले आहे तसे "अल्लादियाखाँ साहेबांच्या रुपाने कोल्हापूरला शोभा देणारे एक नवे लेणेच मिळाले."

अल्लादियाखाँ यांनी कोल्हापूरचे नाव देशभर नेले. ते शाहू महाराजांच्या राजदरबारातील केवळ एक आश्रित गायक नव्हते तर महाराजांच्या परिवाराचेच सन्माननीय सदस्य झाले होते. महाराज त्यांच्याशी धनी म्हणून कधीच वागले नाहीत तर सदैव मित्र या नात्याने लाभले. अल्लादियाखाँ यांनाही शाहू महाराजांविषयी कमालीचा आदरभाव होता. ते त्यांना दैवतच मानत असत. १९०१ मध्ये अब्दुल करीमखाँ प्रथमच कोल्हापूरला आले असताना महाराजांनी त्यांचे गाणे आपल्या दरबारात केले व त्यांना भरपूर बिदागी दिली.

देवसाचे प्रसिध्द गवई रजब अलीखाँ त्यांचे विडल मुगलेखाँ, किरणा घराण्याचे अध्वर्यू हैदरबक्षखाँ, अब्दुल करीमखाँ, अंजनीबाई मालपेक अशा अनेक महान गायक गायिकांनाही महाराजांचा आश्रय लाभला होता.. रजबअलीखाँनी आपल्या कोल्हापूरच्या वास्तव्यात निवृत्ती बुवा सरनाईक आणि नूतन गंधर्व, अप्पासाहेब देशपांडे यांना संगीताचे धडे शिकविले होते.

## ● उपसंहार :-

छत्र.शाहू महाराजांना या गोष्टीचे स्पष्ट भान होते की, समाज केवळ आर्थिक सुबत्तेच्या किंवा सामाजिक सुधारणेच्या बळावर सुखी व समृध्द होत नसतात. तर त्यासाठी त्यांचे सांस्कृतिक जीवनही रसरशीत असण्याची गरज असते. अन्न, वस्त्र, निवारा इ. गरजा भागविल्यानंतरीही माणसाला माणूसपणाचे जीवन जगण्यासाठी काही कला, छंद, कौशल्ये त्याच्या अंगी असणे आवश्यकच असते. समाजात समानता, सोयी आणि सुविधा निर्माण करण्याइतकेच महत्व राजांनी कला, क्रीडा, संस्कृती यांच्या जोपासनेला त्यामुळेच दिलेले दिसून येते. विविध क्षेत्रातील गुणवंतांना एकत्र आणून महाराजांनी त्यांच्या गुणांची पूजा बांधली, हरतऱ्हेची मदत केली व उदार आश्रय दिला. ते स्वतः एक सहदय रसिक असल्यामुळे सर्वच कलांना न्याय देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करणे त्यांना सहज शक्य झाले. कलांचा विकास झाल्याने समाजाचा सांस्कृतिक दर्जा उंचावला. त्यामुळे त्यांच्या अवघ्या तीन दशकांच्या राजवटीमध्ये त्यांचे संस्थान हे अनेक कला, क्रीडा विदयांचे माहेरघर झाले आणि विविध क्षेत्रातील तिथल्या अग्रगण्य कलावंतांनी दिगंत कीर्ती संपादित केली.

## ● संदर्भ ग्रंथ सूची :-

१) कीर, धनंजय "राजर्षी शाहू छत्रपती" पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००८.
२) पवार, जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००१.
३) पानसरे, गोविंद "राजर्षी शाहू आणि वारसा" लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००७.
४) भोसले, एस.एस (संपा.) "राजर्षी शाहू-काळ विचार आणि कार्य" जिल्हा परिषद, कोल्हापूर, १९७६.
५) केळुस्कर, मनोहर "कलाप्रेमी राजा" राशाग्रौगं, १९७६.
६) भोळे लक्ष्मण "छत्रपती शाहू महाराज" गंधर्व-वेद प्रकाशन, पुणे, २०१०. पान नं.१३३, १३५.
७) तोफखाने, वा.द "राजर्षी शाहू छत्रपतींचे अंतरंग-एक शोध" राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, १९७६.